पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम ता जि वाशिम
कार्यालय दुरध्वनी क 07252–234824
ई–मेल sp.washim@mahapolice.gov.in
website:www.washimpolice.gov.in
*********

प्रेसनोट /2021

दि. .12.2021

## पोलीस तपासामध्ये फिंगर प्रिंट व ॲम्बीस यंत्रणा बाजवते महत्त्वाची भुमीका

वाशिम जिल्हयातील गुन्हेगारीवर आळा बसावा याकरीता आरोपी/संशयीताने आपल्या बोटांचे ठसे गुन्हयाचे घटनास्थळी नकळतपणे सोडलेले असतात असे चान्सप्रिंट गोळा करून डेव्हलप करून गुन्हे उघडकीस आणण्याकरीता अंगुली मुद्रा विभागचा मोलाचा वाटा असतो.

अंगुली मुद्रा विभाग वाशिम जिल्हयात कार्यान्वीत असुन दिल्ली येथील ऑल इंडीया लेव्हलची परिक्षा उत्तीर्ण करूनच चान्सप्रिंट डेव्हलपींग साठी कनिष्ठ तज्ञ/सहा पोलीस निरीक्षक अंगुली मुद्रा अशी नेमणुक होते. अटक आरोपींचा अंगुली मुद्राचा रेकॉर्ड ठेवणेकरीता व तो गुन्हे अन्वेषण ब्युरो नागपुर मधील अंगुलीमुद्रा विभाग येथे पाठविण्याकरीता तपासणीस अंगुलीमुद्रा तज्ञ यांना मदतनीस म्हणुन दोन पोलीस मुख्य यंत्र चालक (PCO) अंमलदार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर पोलीस अंमलदर यांनी मा. पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग पुणे, येथे ९० दिवसांचे निवासी प्रशिक्षण घेतले आहे. प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर त्यांची अंगुली मुद्रा विभाग येथे नेमणुक करण्यात येते. सदर मोबाईल फॉरेन्सिक सपोर्ट व्हॅन मध्ये गुन्हे घटनास्थळावर असलेले दृश्य अदृश्य पुरावे शास्त्रोक्त पध्दतीने जमा करण्याकरीता १. चान्स प्रिंट डेव्हलप कीट २.मॅग्नीफाईन ग्लास ३.टॉर्च ४. चान्स प्रिंट कॅमेरा अशा प्रकारचे साधन सामुग्री देण्यात आले आहे.

गुन्हयात अटक व शिक्षा प्राप्त आरोपींच्या अंगुलीमुद्रा पत्रिका गोळा करून व त्या तपासणी करून अंगुली मुद्रा केंद्र नागपुर येथे अभिलेख तयार करणे व पुर्व शिक्षा असल्यास ते तपासणी करीता पाठविला जातो. मोबाईल फॉरेन्सिक सपोर्ट व्हॅन मधील साहीत्याचा उपयोग करून कनिष्ठ तज्ञ हे घरफोडी, चोरी, दरोडा, खुन घटनास्थळी भेट देवुन बारकाईने तपासणी करून दृश्य/अदृश्य चान्स प्रिंट डेव्हलप करून फोटोग्राफर यांच्या कडुन फोटो प्राप्त करून गुन्हे अन्वेषण विभाग अमरावती व नंतर गुन्हे अन्वेषण ब्युरो नागपुर येथे फायनल अभिप्रायाकरीता पाठविल्या जातो व तेथुन आलेला अहवाल हा तपासी अधिकारी यांना दिला जातो. या वर्षी एकुण ५८ गुन्हयाचा घटनास्थळी भेटी दिल्या आहेत.त्यापैकी पोलीस स्टेशन मंगरूळपिर अप क्रमांक १७४/२०१९ कलम ४२७, ३८०, ३९४, ३४२, ५०६, १२० ब भादंवि, पोलीस स्टेशन शिरपुर अप क्रमांक २३७/२०२० कलम ३०२, १२० ब, ३४, २०१ भादंवि, ४, २५ शस्त्र अधिनियम या तिन्ही गुन्हयातील प्राप्त भौतिक पुरावे एकरूप आढळुन आल्याने आरोपी निष्पन्न झाले आहे.

तसेच आरोपीचा कर्दनकाळ म्हणुन ओळखली जाणारी ॲम्बीस सिस्टम ही काही दिवसातच अमरावती विभागात कार्यान्वीत होणार आहे. त्यानंतर कोणत्याही आरोपी किंवा संशयीताने भारतात कोठेही केव्हाही गुन्हा केलेला असेल तर ॲम्बीस ही तावडतोब चान्सप्रिंट किंवा लाईव्ह फिंगर स्कॅनरने सुध्दा माहिती मिळेल. ॲम्बीस सिस्टम मध्ये डोळयाचे स्कॅन सुध्दा केले जात असुन चेह–याची चेहरेपटटी पण सिस्टम मध्ये फिल्ड करत आहे. त्यामुळे सिसीटिव्ही कॅमेरात आलेला व्य क्तीसुध्दा ट्रेस होणार आहे.

अशा आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने व त्याचा वापर केल्याने फिंगरप्रिंट, चेहरा, डोळे अशा कोणत्याही प्रकारे आरोपी/संशयीत वाचणार नाहीत. यामुळे पोलीसांना तपासकार्यात मोठया प्रमाणात सहकार्य मिळणार आहे.

पोलीस निरिक्षक
स्थानिक गन्हे शाखा, वाशिम